**मे. श्री विठठलसाई सहकारी साखर कारखाना लिमिटेड, राजीवगांधी नगर, मुरुम, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद, महाराष्ट्र या उदयोगाच्या प्रस्तावित ३० किलो लिटर प्रतिदिन मळीवर आधारीत आसवणी निर्मिती प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्तांत :**

............................................................................................................................

मे. श्री विठठलसाई सहकारी साखर कारखाना लिमिटेड, राजीवगांधी नगर, मुरुम, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद, महाराष्ट्र या उदयोगाच्या प्रस्तावित ३० किलो लिटर प्रतिदिन मळीवर आधारीत आसवणी निर्मिती प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, उस्मानाबाद यांचे अध्यक्षतेखाली दि. २० ऑगष्ट २०२१ रोजी दुपारी ११-३० वाजता घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई - ५५ / २०२१ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २१०७२३ – एफटीएस – ०१५३ दि. २३/०७/२०२१ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, उस्मानाबाद | : | अध्यक्ष |
| २. | प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, औरंगाबाद | : | सदस्य |
| ३. | उप-प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, लातूर | : | समन्वयक |

श्री. जयंत कदम, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ लातूर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली.

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी सदर उदयोगाने रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाला होता. त्या अनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे. सदर बाबतची जाहीर सुचना दि. ०९/०७/२०२१ रोजी दै. सकाळ (मराठी) व दी टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, परभणी येथे पाठविण्याचे नमुद करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाविषयी पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या व कार्यकारी सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद
- जिल्हा उदयोग केंद्र, उस्मानाबाद
- जिल्हा परिषद, उस्मानाबाद
- तहसिल कार्यालय, उमरगा, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद
- ग्रामपंचायत कार्यालय, सुंदरवाडी, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद
- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, लातूर.
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, (मुख्यालय), मुंबई
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पुर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर

उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर प्रकल्पा बाबत अदयाप पावेतो उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ लातूर यांचेकडे रुरल इन्हवायर्नमेंट एज्युकेशन अॅण्ड हेल्थ अवेरनेस सोसायटी यांच्यावतीने श्री. एच.मधुबाबू यांचे निवेदन मेलद्वारे दि. १५/०८/२०२१ रोजी प्राप्त झाले आहे याव्यतिरिक्त कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात प्राप्त झालेला नाही. कोणास कांही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

समन्वयक यांनी अध्यक्ष, जाहीर लोक सुनावणी समिती यांना सदर प्रकल्प धारकांस / त्यांचे प्रतिनिधीस सादरीकरण करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

मा. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, उस्मानाबाद व अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना प्रकल्पाबददल सादरीकरण करण्याचे आदेशित केले.

प्रकल्पाचे प्रतिनिधी व पर्यावरण सल्लागार वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट, पुणे यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी नियोजित प्रकल्पाविषयी केलेल्या सादरीकरणा नंतर नागरिकांनी मांडलेल्या सूचना / आक्षेप इत्यादींचा वृत्तांत खालीलप्रमाणे.

**<u>प्रोसेडींग :</u>**

| अ. क्रं. | टिका टिप्पणी, आक्षेप सुचना मुददा इत्यादी नोंदविणा-या व्यक्तिचे नांव व पत्ता | उदयोगाच्या प्रतिनिधीने दिलेले आश्वासन / उत्तर |
|---|---|---|
| १. | श्री. उल्हास सुभाष घुरघुरे रा. वरनाळवाडी यांनी मुददा उपस्थित केला की, प्रस्तावित आसवनीसाठी ८६८ घनमीटर पाण्याची आवश्यकता लागणार आहे त्यासाठी नियोजन काय आहे? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, ७० टक्के पाण्याचा पुर्नवापर करण्यात येणार असल्यामुळे २६० घनमीटर पाण्याची आवश्यकता भासणार आहे. डॅमचे पाणी उपलब्ध करुन घेण्यासाठी पाटबंधारे खात्याकडून नाहकरकत घेण्यात आल्याचे नमूद केले. |
| २. | श्री. बालाजी बीदे रा. भोसगा यांनी मुददा उपस्थित केला की, सदर प्रकल्पामुळे या भागात कांही सुधारणा होणार आहेत काय? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, सदर परिसराचा विकास होईल. स्थानीक लोकांना रोजगार उपलब्ध होईल. उत्पन्न वाढल्यामुळे आर्थिक विकास होईल. |
| ३. | सदस्य पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तथा प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, औरंगाबाद यांनी मुददा उपस्थित केला की, सदर प्रकल्पामुळे अप्रत्यक्ष काय फायदे होतील? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, सदर प्रकल्पामुळे वाहतुकदार व हॉटेल व्यावसायीक यांना फायदा होईल. |
| ४. | श्री. मोहम्मद अली गुलाब मुल्ला रा. सुंदरवाडी यांनी मुददा उपस्थित केला की, सदर प्रकल्पामुळे स्थानीक | उदयोगाच्या प्रतिनिधींनी नमुद केले की, सदर प्रश्नास अनुसरुन यापुर्वीच उत्तर दिले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | लोकांना व शेतक-यांना काय फायदा होईल? | |
| ५. | श्री. एच. मधुबाबू हैद्राबाद, सामाजिक पर्यावरण कार्यकर्ता यांनी त्यांनी सादर केलेले निवेदनाचा विचार व्हावा अशी विनंती केली. | प्रादेशिक अधिकारी तथा सदस्य पर्यावरण विषयी जाहीर लोकसुनावणी यांनी आश्वासित केले की, सदर निवेदन अहवालासोबत जोडण्यात येईल. |
| ६. | श्री. विष्णुमुर्ती हैद्राबाद, पर्यावरण कार्यकर्ता यांनी कारखाना परिसरात दर महिन्याला आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्याची विनंती केली. | उदयोगाच्या प्रतिनिधींनी नमुद केले की, आरोग्य तपासणी शिबीरे यापुर्वीच आयोजित करण्यात आली आहेत व भविष्यात आरोग्य तपासणी शिबीरे आयोजित करण्यात येतील. |
| ७. | श्री. व्यंकट रेडडी हैद्राबाद, पर्यावरण कार्यकर्ता यांनी त्यांनी सुचविलेल्या मुदयांचा विचार करण्याची विनंती केली जसे की,- प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक त्या उपाय योजना करण्यात याव्यात, शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यात यावा, आरोग्य तपासणी शिबीरे आयोजित करण्यात यावीत, सीएसआर फंडाचा वापर प्रदूषणामुळे दुष्परिणाम होणा-या गावांसाठी करण्यात यावा इ. सदर प्रकल्पास पाठींबा व्यक्त केला. | उदयोगाच्या प्रतिनिधींनी नमुद केले की, सीएसआर फंडाची तरतुद करण्यात आली आहे. कारखान्याच्या व्यवस्थापकांनी नमुद केले की, कारखान्यामार्फत नियमित आरोग्य तपासणी शिबीरे आयोजित करण्यात येतात. कारखान्यामार्फत शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| ८. | सदस्य पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तथा प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, औरंगाबाद यांनी मुददा उपस्थित केला की, उस्मानाबाद, तुळजापूर आणि उमरगा येथून भुजल नमुने घेण्यात आलेले नसल्यामुळे सदरचा परिच्छेद प्रारुप ईआयए अहवालातून वगळण्यात यावा.<br><br>प्रिडॉमिनंट विंड डायरेक्शन कुठे आहे? त्यांना कसा धोका होईल? ऑनलाईन ओसीईएमएस लावावे लागेल. | उदयोगाच्या प्रतिनिधींनी नमुद केले की, हवेची दिशा पुर्व आणि ईशान्यकडे आहे. सुंदरवाडी दक्षिणेकडे आहे. सुंदरवाडीमध्ये फक्त १ मायक्रोग्रॅमने हवेच्या पातळीमध्ये वाढ होऊ शकते.<br><br>तसेच उदयोगाच्या प्रतिनिधींनी आश्वासित केले की, सदस्य पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तथा प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, औरंगाबाद यांनी उपस्थित केलेल्या मुदयांची पुर्तता करण्यात येईल. |
| ९. | मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तथा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, उस्मानाबाद यांनी नमुद केले की, पर्यावरणाचा मुख्य घटक वृक्ष असल्यामुळे घनदाट झाडी लावण्याचे व हरित पटटा विकसित करण्याचे आदेशित केले. तसेच कारखाना परिसरातील शेतकरी / नागरिक यांचे आरोग्य तपासणी शिबीरे घेण्याचे व आजूबाजूच्या परिसरात वृक्ष लागवड करण्याचे आदेशित केले. | तसेच उदयोगाच्या प्रतिनिधींनी आश्वासित केले की, उपलब्ध क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्रावर वृक्षलागवड करण्यात येईल. एका हेक्टरवर साधारणत: १५०० झाडी लावण्यात येतात. |

सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा मा. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, उस्मानाबाद यांनी नमूद केले की, अजुनही कोणाला कांही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. तथापि, कोणीही पुढे आले नाही. तसेच त्यांनी नमुद केले की, सुनावणीचे सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद यांनी उपस्थित केलेल्या सुचनांचे उदयोगाने पुर्तता करावी व त्याचा समावेश अंतिम इआएमध्ये करण्यात यावा. तदनंतर सदर सुनावणीचे समन्वयक यांनी सदर सुनावणीचा सारांश विषद केला व संबंधितांचे आभार मानले व मा. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, उस्मानाबाद यांचे परवानगीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **( जयंत कदम )** | **( डॉ.प्र.म.जोशी )** | **( शिवकुमार स्वामी )** |
| समन्वयक तथा उप्राअ | सदस्य तथा प्रा.अ. | अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी |
| मप्रनि मं. परभणी | मप्रनि मं. औरंगाबाद | उस्मानाबाद |

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE Osmanabad